यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन
नाशिक – ४२२ २२२ (महाराष्ट्र) भारत

ज्ञानगंगा घरोघरी

Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade
Dnyangangotri, Near Gangapur Dam, Govardhan
Nashik - 422 222 (Maharashtra) India

संकेतस्थळ Website : •www.ycmou.ac.in •https://ycmou.digitaluniversity.ac
ई-मेल E-mail : dir_shu@ycmou.digitaluniversity.ac दूरध्वनी Telephone : (0253) 2231475

मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा / School of Humanities & Social Sciences

दिनांक: १४/११/२०२५

# उद्बोधन वर्ग अहवाल : शैक्षणिक वर्ष २०२५-२६

## जनसंज्ञापन व वृत्तपत्रविद्या पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रम (M90)

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (DEB) मार्गदर्शक सूचनेनुसार पदव्युत्तर पदवी एम. ए. जनसंज्ञापन व वृत्तपत्रविद्या (M90) या शिक्षणक्रमाला प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी उद्बोधन वर्ग दि. १२/११/२०२५ रोजी दुपारी ०२.३० ते ४.०० या वेळेत मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेमध्ये ऑनलाईन माध्यमातून आयोजित केला होता. यावेळी शिक्षणक्रम संयोजक धम्मरत्न जावळे यांनी प्रास्ताविक व उद्बोधन वर्ग आयोजित करण्याची भूमिका विशद केली. या उद्बोधन वर्गासाठी विद्याशाखेचे संचालक प्रा. नागार्जुन वाडेकर यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांनी विद्यार्थ्यांना दूरस्थ शिक्षणप्रणाली, विद्यापीठाची पार्श्वभूमी, विद्यापीठाचा परिचय, उदिष्टे, विद्यापीठ कार्यपद्धती याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.


उद्बोधन सत्रात धम्मरत्न जावळे यांनी Canva – स्लाइड-शोच्या माध्यमातून सदर शिक्षणक्रमाची ओळख करून दिली. त्यामध्ये त्यांनी मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेचा परिचय, उद्दिष्टे, शिक्षणक्रमाची उद्दिष्टे, निष्पती, शिक्षणक्रम संरचना, अभ्यासक्रम संरचना, श्रेयांक पद्धती, मूल्यमापन संरचना, मुल्यांकन पद्धत , स्वयं-अध्ययन साहित्य, समंत्रण सत्रे, गृहपाठ पद्धती, विद्यार्थी कल्याणाच्या विविध योजना, महत्वाची संकेतस्थळे व नोकरीच्या भविष्यातील संधी या विषयी सविस्तर सादरीकरण केले.


उद्बोधन सत्रानंतर सहभागी विद्यार्थ्यांसोबत प्रश्नोत्तराचे सत्र झाले. यावेळी विद्यार्थ्यांनी शिक्षणक्रमाविषयी तसेच अभ्यासक्रमाबाबत विविध प्रश्न विचारले. त्या सर्व प्रश्नांचे विस्तृत निराकरण करण्यात आले. काही विद्यार्थ्यांनी माध्यम, पत्रकारिता व आंतरविद्याशाखीय क्षेत्राबाबत, तसेच भविष्यकालीन करिअरविषयक मार्गदर्शन मिळण्यासाठी अतिरिक्त सत्र / वर्ग घेण्याची मागणी केली. त्या बाबत विद्यार्थ्यांना आश्वस्त करण्यात आले.


या उद्बोधन सत्रात प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. शेवटी उपस्थित विद्यार्थ्यांचे आभार मानून मा. संचालक सरांच्या संमतीने उद्बोधन वर्गाचा समारोप करण्यात आला. हा उद्बोधन वर्ग यशस्वी होण्यासाठी शैक्षणिक संयोजक - डॉ. सुनील भारोडकर, डॉ. महेंद्र भगत, तसेच प्रशासकीय सहाय्यक श्री. गुलाब घाटाळ यांनी मोलाचे सहकार्य केले.


**सोबत** : युट्युब लिंक व फोटो.

YouTube Link: https://www.youtube.com/live/P7jWsrT1k5k?si=kfsCHYy8Ya0uCRkZ




मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा * य.च.म.मु.वि., नाशिक

संचालक
मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा
Director
School of Humanities and Social Sciences
Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik